खडक पोलीस स्टेशन पुणे
दिनांक – ०६/०२/२०१८

# प्रेसनोट

---

**शटर उचकटुन घरफोडी चोरी करणारे टोळीतील सराईत त्याचे दोन अल्पवयीन साथीदारासह जेरबंद घरफोडी व वाहनचोरी सह सहा गुन्हे उघड रोख, लॅपटॉप वाहनासह ऐंशी हजार रुपयाचा ऐवज हस्तगत**

---

श्री युसुफ नजमुददीन पाटणवाला वय-३७ व्यवसाय – चार्टड अकौंउट रा - अंबावटिका एनआयबीएम रोड कोंढवा खुर्द पुणे यांचे मालकीचे अजमेरा सोसायटी शॉप नं १० जुना मोटार स्टँडजवळ भवानी पेठ पुणे हे ऑफीस कुलुप लावुन बंद असताना दिनांक – ३१/०१/२०१८ रोजी रात्रौ ०८/१५ ते दिनांक – ०१/०२/२०१८ रोजी सकाळी १०/०० वा चे दरम्यान अज्ञात चोरटयाने शटर उचकटुन त्यावाटे ऑफीसमध्ये प्रवेश करुन एक लॅपटॉप, डोंगल असा ऐवज घरफोडी चोरुन करुन नेला होता त्याबाबत त्यांनी पोलीसांकडे तक्रार दिलेली आहे.

खडक पोलीस स्टेशन पुणे येथील अधिकारी व कर्मचारी गुन्हयाचा तपास करत असताना पोलीस कर्मचारी अशिष चव्हाण यांना त्यांचे खब-याकडुन माहीती मिळाली की सदर गुन्हा पोलीस अभिलेखावरील सराईत हंज्या ऊर्फ हनुमंत धनगर व त्याचे दोन अल्पवयीन साथीदार यांनी केलेला आहे व ते सध्या चोरीच्या काळे रंगाचे ॲक्टीव्हा मोपेडवरुन भवानी पेठ कासेवाडी भागात फिरत आहेत अशी खात्रीशीर बातमी मिळाल्यानंतर पोलीसांनी भवानी पेठ कासेवाडी जनरल अरुणकुमार वैदंय स्टेडियम या भागात सापळा लावुन दिनांक – ०४/०२/२०१८ रोजी संशयीत आरोपी हनुमंत ऊर्फ हंज्या काशप्पा धनगर वय-३८ रा - राजीवगांधी कॉम्प्लेक्स भवानी पेठ पुणे यास व त्याचे अल्पवयीन साथीदारांना ताब्यात घेतले आहे त्यावेळी त्याचे ताब्यात मिळुन आलेली होंडा ॲक्टिव्हा मोपेड नंबर एमएच१२/सीसी४०५२ ही त्यांनी वटेश्वर भुवन भवानी पेठ पुणे चे समोरुन चोरली असल्याची माहीती पोलीसांना दिली आहे त्याबाबत कुमारी मृण्मयी मिलिंद थोरात रा – १२३ रामगंगा अपार्टमेंट भवानी पेठ पुणे यांनी पोलीसांकडे तक्रार दिलेली आहे. त्यांचेकडे सखोल तपास करता त्यांनी युसुफ पाटणवाला यांचे ऑफीसचे शटर उचकटुन चोरी तेथील लॅपटॉप चोरल्याचे तसेच सेव्हन लव्हज चौक शंकरशेठ रोडवरील अजंठा वाईन शॉप या दुकानाचे शटर व जाळीचे दरवाजाचे कुलुपे तोडुन तेथील रोख रक्कम चोरल्याचे तसेच अशाप्रकारे आणखी तीन ते चार ठिकाणी शटर उचकटुन चोरी केल्याचे उघडकीस आले आहे. कासेवाडी भवानी पेठ परिसरातुन एक ग्रे रंगाची ॲक्टिव्हा चोरल्याचे माहीती पोलीसांना दिली ती त्यांचे जप्त करण्यात आलेली आहे त्याबाबत श्री मोहनलाल अन्नाराम चौधरी रा – कासेवाडी भवानी पेठ पुणे यांनी तक्रार दिलेली आहे. **आरोपीकडुन रोख रक्कम, एक लॅपटॉप, दोन ॲक्टिव्हा मोपेड असा ऐंशी हजाराचा माल हस्तगत करण्यात आलेला आहे व एकुण सहा गुन्हे उघडकीस आलेले आहे.**

आरोपी हनुमंत ऊर्फ हंज्या काशप्पा धनगर हा पोलीस अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे त्याचेविरुध्द यापुर्वी चोरी, गंभीर दुखापत, हत्यार जवळ बाळगणे असे चार गुन्हे दाखल आहेत. त्याचेविरुध्द यापुर्वी प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली आहे.

**तसेच अल्पवयीन मुलांपैकी एकाविरुध्द खडक व चंदननगर पोलीस स्टेशन पुणे येथे घरफोडी चोरीचे तीन गुन्हे व दुस-या अल्पवयीन मुला विरुध्द खडक व समर्थ पोलीस स्टेशन येथे चोरी, घरफोडी चोरी असे एकुण चार गुन्हे दाखल आहेत त्या दोघांपैकी एकजण दिनांक – २२/०१/२०१८ व दुसरा दिनांक – ३०/०१/२०१८ रोजी बाल सुधारगृह येरवडा पुणे येथुन सुटले आहे व त्यांनी सुटल्यानंतर लगेच पुन्हा चो-या करण्यास सुरुवात केली होती असे तपासात निष्पन्न झाले आहे.**

आरोपींनी अशाप्रकारे घरफोडी व वाहन व इतर चोरीचे आणखी गुन्हे केले आहेत काय ? त्याचे कोणी साथीदार आहेत काय ? याबाबत पोलीस तपास करत आहेत. आरोपी हनुमंत ऊर्फ हंज्या काशप्पा धनगर यास मा. वाय. एस. पैठणकर प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सहावे न्यायालय पुणे यांचे न्यायालयात आरोपीस हजर केले असता त्यास दिनांक – ०७/०२/२०१८ रोजी पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिलेले आहेत. तसेच अल्पवयीन मुलांना पुन्हा बाल सुधार गृह येरवडा पुणे येथे पाठविण्यात आलेले आहे.

सदर कामगिरी परिमंडळ १ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री. बसवराज तेली, शहर विभाग पुणे चे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. किशोर नाईक यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र मोकाशी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री संभाजी शिर्के, सहायक पोलीस निरीक्षक जुबेरअहमद मुजावर व तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक संजय गायकवाड, अनंता व्यवहारे व तपास पथकातील कर्मचारी विश्वनाथ शिंदे, बापु शिंदे, विद्याधर गांगुर्डे, बळवंत गावीत, अनिकेत बाबर, गणेश माळी, इम्रान नदाफ, सचिन खाडे यांनी केलेली आहे.